# NMMC 93

# School Monthly Progress Report - May 2026

1. **Admission Lottery 2026-27**

On 6 May 2026, the school conducted a transparent admission lottery for Nursery new admissions and lateral admissions from Junior KG to Grade 9 to fill vacant seats. Eligible applicants were shortlisted based on the prescribed age criteria and proximity to the school. The lottery was streamed online, ensuring openness and fairness, with chits drawn by students and children present at the venue. The entire process was conducted in the presence of officials from the NMMC Education Department.

Following the lottery, the school completed the documentation process for all selected students. The school team provided continuous support to parents, guiding them through the admission formalities and explaining the next steps. An orientation programme for newly admitted parents was scheduled for June, and all new students were expected to join the school by mid-June 2026, ensuring a smooth transition into the new academic year.

**प्रवेश लॉटरी प्रक्रिया**

दि. ६ मे २०२६ रोजी शाळेमध्ये नर्सरीच्या नवीन प्रवेशांसाठी तसेच ज्युनिअर केजी ते इयत्ता ९ पर्यंतच्या रिक्त जागा भरण्यासाठी पारदर्शक प्रवेश लॉटरी प्रक्रिया आयोजित करण्यात आली. पात्र विद्यार्थ्यांची निवड वयोमर्यादा आणि शाळेपासूनचे अंतर या निकषांच्या आधारे करण्यात आली. संपूर्ण लॉटरी प्रक्रिया ऑनलाइन थेट प्रक्षेपित करण्यात आली. उपस्थित विद्यार्थी व लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या, ज्यामुळे प्रक्रियेची पारदर्शकता आणि निष्पक्षता सुनिश्चित झाली. ही प्रक्रिया नवी मुंबई महानगरपालिका (NMMC) शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली.




लॉटरीनंतर निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशासंबंधित कागदपत्र पडताळणी व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. शाळेच्या टीमने पालकांना प्रवेश प्रक्रियेतील पुढील टप्प्यांची सविस्तर माहिती देऊन आवश्यक मार्गदर्शन केले. नव्याने प्रवेश घेतलेल्या पालकांसाठी जून महिन्यात ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सर्व नवीन विद्यार्थी जून २०२६ च्या मध्यापर्यंत शाळेत नियमितपणे सहभागी झाले.

## 2. EDventures: An Orientation Programme for New Staff

During the summer break, all newly recruited teachers and school leaders participated in the Ed-Ventures residential orientation programme held at Sandipani Hometel, Symbiosis Hilltop Campus, Lavale, Pune, from 20–26 May 2026. The programme equipped new staff with a strong understanding of The Akanksha Foundation's history, vision, mission, and child-centred approach to education.

THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.



Teachers engaged in sessions on effective classroom practices, student engagement, and building inclusive learning environments. Interactions with students and alumni provided valuable insights into the long-term impact of the organisation's work. School Leaders, Assistant School Leaders and Team Leaders attended specialised workshops aligned with the organisation's "Good to Great" strategy, focusing on instructional leadership and school improvement. The orientation also encouraged collaboration, reflection, and team building, ensuring that all new staff were well prepared to begin the academic year with confidence and a shared sense of purpose.

**नवीन कर्मचाऱ्यांसाठी ओळख व प्रशिक्षण कार्यक्रम**

उन्हाळी सुट्टीदरम्यान २० ते २६ मे २०२६ या कालावधीत पुणे येथील लवळे, सिंबायोसिस हिलटॉप कॅम्पसमधील संदीपनी होमटेल येथे नव्याने रुजू झालेल्या शिक्षक व शालेय नेतृत्व संघासाठी **"एड-व्हेंचर्स"** निवासी ओळख व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाद्वारे सहभागी कर्मचाऱ्यांना आकांक्षा फाउंडेशनचा इतिहास, दृष्टी, ध्येय आणि बालकेंद्रित शिक्षणाची तत्त्वे यांची सखोल ओळख करून देण्यात आली.

शिक्षकांसाठी प्रभावी अध्यापन पद्धती, विद्यार्थी सहभाग आणि समावेशक वर्गनिर्मिती यावर कार्यशाळा घेण्यात आल्या. विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादातून संस्थेच्या कार्याचा दीर्घकालीन सकारात्मक परिणाम समजून घेण्याची संधी मिळाली. शालेय प्रमुख, सहाय्यक शालेय प्रमुख, टीम लीडर्स साठी संस्थेच्या **"गुड टू ग्रेट"** धोरणाशी सुसंगत नेतृत्व विकास व शाळा सुधारणा विषयक विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे सर्व नवीन कर्मचारी आगामी शैक्षणिक वर्षासाठी आत्मविश्वासाने आणि समान उद्दिष्टांसह सज्ज झाले.

THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## 3. School Leadership Stepback Programme

On 12th and 13th May 2026, the School Leadership Team participated in the annual School Leadership (SL) Stepback programme to prepare strategically for the upcoming academic year. The two-day workshop focused on an in-depth analysis of the End-of-Year (EOY) assessment data to identify student learning trends, strengths, and priority areas for improvement.

The programme included sessions on understanding community perspectives, data-driven decision-making, restorative practices for student behaviour, instructional rigor and self-reflection for leadership impact to learn from effective practices. School leaders also engaged in collaborative discussions on curriculum updates and organisational priorities for the new academic year.

The Stepback enabled the leadership team to convert assessment findings into clear, actionable plans, strengthening academic planning, instructional quality, and student outcomes for the 2026–27 academic year.

**शालेय नेतृत्व स्टेपबॅक कार्यक्रम**

दि. १२ व १३ मे २०२६ रोजी शाळेच्या नेतृत्व संघाने आगामी शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासाठी आयोजित **स्कूल लीडरशिप (SL) स्टेपबॅक** कार्यक्रमात सहभाग घेतला. या दोन दिवसीय कार्यशाळेचा मुख्य उद्देश वार्षिक अंतिम (EOY) मूल्यमापनाच्या निकालांचे सखोल विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील प्रवृत्ती, बलस्थान आणि सुधारणा आवश्यक असलेली क्षेत्रे ओळखणे हा होता.

या कार्यक्रमामध्ये समुदायाच्या अपेक्षा समजून घेणे, माहिती-आधारित निर्णय प्रक्रिया, विद्यार्थ्यांच्या वर्तन व्यवस्थापनासाठी पुनर्स्थापनात्मक (Restorative) पद्धती, अध्यापनातील गुणवत्तावृद्धी, नेतृत्वातील आत्मपरीक्षण तसेच अभ्यासक्रमातील बदल आणि संस्थेच्या आगामी शैक्षणिक वर्षातील प्राधान्यक्रमांवर सखोल चर्चा करण्यात आली.

THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

या स्टेपबॅक कार्यक्रमामुळे शालेय नेतृत्व संघाला मूल्यमापनातून मिळालेल्या निष्कर्षांचे कृती आराखड्यात रूपांतर करून शैक्षणिक नियोजन, अध्यापनाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती अधिक प्रभावी करण्यास मदत झाली.

## 4. Educational Sports Exposure Visit

On 24th May 2026, 140 students from Grades 6 to 9 were given the exciting opportunity to watch the IPL match between Mumbai Indians and Rajasthan Royals at the Wankhede Stadium, Mumbai. The visit was made possible through the generous support of the Reliance Foundation and Oscar Foundation, two not-for-profit organisations committed to promoting sports excellence among school students.

To ensure a safe and enjoyable experience, transportation was arranged through dedicated buses. Students were provided with event T-shirts and snack boxes, making the outing comfortable and memorable. For many children, this was their first opportunity to experience a live international-standard cricket match in a stadium. The students were thrilled by the vibrant atmosphere and returned inspired by the spirit of sportsmanship, teamwork, and excellence. The visit created lasting memories and encouraged greater interest in sports and physical well-being.

**क्रीडा क्षेत्रातील प्रेरणादायी शैक्षणिक भेट**

दि. २४ मे २०२६ रोजी इयत्ता ६ वी ते ९ वीतील १४० विद्यार्थ्यांना मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथे मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील आयपीएल सामना प्रत्यक्ष पाहण्याची सुवर्णसंधी मिळाली. ही संधी शालेय विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणाऱ्या **रिलायन्स फाउंडेशन** आणि **ऑस्कर फाउंडेशन** या स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपलब्ध झाली.

THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33



विद्यार्थ्यांच्या सुरक्षित आणि आनंददायी प्रवासासाठी बसची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सर्व विद्यार्थ्यांना टी-शर्ट आणि अल्पोपहाराचे बॉक्स देण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियममध्ये प्रत्यक्ष सामना पाहण्याचा हा अविस्मरणीय अनुभव होता. स्टेडियममधील उत्साहपूर्ण वातावरण, खेळाडूंची कामगिरी आणि क्रीडाभावनेचा अनुभव घेत विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रती अधिक प्रेरणा निर्माण झाली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना संघभावना, शिस्त आणि उत्कृष्टतेचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले.

### 5. Scout Master Training Achievement

The school is proud to share that Ms. Sushma Wakchaure successfully completed the **Praveen Scout Master Training** conducted by the Maharashtra State Bharat Scouts and Guides. The residential training was held at the State Training Centre, Gaganbawda, Kolhapur, from **2nd May to 12th May 2026**. Upon successful completion of the programme, she was awarded the **Praveen Scout Master Certificate**.

THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33



The training strengthened her leadership, outdoor education, discipline, teamwork, and life skills, enabling her to guide students more effectively through the Scouts and Guides programme. This certification will enhance the school's capacity to provide quality scouting activities that promote character building, self-reliance, community service, and responsible citizenship among students. The school congratulates Ms. Wakchaure on this achievement and looks forward to expanding opportunities for students through the Scouts and Guides movement.

**स्काऊट मास्टर प्रशिक्षणातील यश**

शाळेच्या सौ. **सुषमा अनंत वाकचौरे** यांनी महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स यांच्या वतीने आयोजित **प्रवीण स्काऊट मास्टर प्रशिक्षण** यशस्वीरित्या पूर्ण केले. हे निवासी प्रशिक्षण **राज्य प्रशिक्षण केंद्र, गगनबावडा, कोल्हापूर** येथे **२ मे ते १२ मे २०२६** या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांना **प्रवीण स्काऊट मास्टर प्रमाणपत्र** प्रदान करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे त्यांचे नेतृत्व कौशल्य, शिस्त, संघभावना, मैदानी उपक्रमांचे नियोजन आणि जीवनकौशल्ये अधिक बळकट झाली आहेत. या प्रमाणपत्राच्या माध्यमातून शाळेतील स्काऊट्स आणि गाईड्स उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव विकसित करण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरेल. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेतर्फे सौ. सुषमा वाकचौरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.